# स्वभाषेची अभिवृद्धि

## स्वाध्याय

### परिच्छेद १


पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ११ वरील (ओळ १ ते १२) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

[मुंबई येथे भांगवाडी .......................

....................... तर मराठी भाषा वाढवा.]

अ. आकलन

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.



उत्तर: १. सुसंस्कृत    २. वाढलेल्या

३. सुधारलेल्या


**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




उत्तर: १. स्वदेश    २. स्वभाषा

३. स्वधर्म

**कृ.३. ओघतक्ता पूर्ण करा.**





उत्तर: १. मराठी आपली भाषा आहे.

२. आपले वाडवडील ती बोलत आले.

३. त्या भाषेतच आपला जन्म झाला.


४. आपल्या जन्माबरोबर उत्पन्न झालेल्या गोष्टींपैकी एक आहे.

कृ.४. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तरः १. लोक २. राष्ट्र

कृ.५. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तरः १. मुंबई इलाखा
२. वऱ्हाड
३. नागपूर
४. निजामशाही

**कृ.६. आकृतिबंध पूर्ण करा.**

**यासाठी मराठी भाषा वाढवा असे टिळक म्हणतात**

(१) (२)

उत्तर: १. मराठी बोलणाऱ्या दोन कोटी लोकांची उन्नती व्हावी यासाठी.

२. मराठी भाषिकांना आपले विचार कळविता यावे यासाठी.

**कृ.७. चौकट पूर्ण करा.**

१. **मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा आठवा वार्षिक समारंभ यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला** → [ ]

२. **भाषा अशा इलाजांनी सुधारत नाही** → [ ]

उत्तर: १. लोकमान्य टिळक २. कृत्रिम

## कृ.८. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. ________ गोष्टीपैकी भाषा ही आहे.

अ. जन्माबरोबर संमिश्र झालेल्या

ब. जन्माबरोबर नष्ट झालेल्या

क. जन्माबरोबर भ्रष्ट झालेल्या

ड. जन्माबरोबर उत्पन्न झालेल्या

२. इंग्रजी भाषा खेडेगांवांत जरी गेली, ________.

अ. तरी मराठी बुडत नाही.

ब. तरी मराठी समृद्ध राहते.

क. तरी फारशी कुणाला येत नाही.

ड. तरी मराठी भाषिक इंग्रजी बोलत नाहीत.

**उत्तर:** १. **जन्माबरोबर उत्पन्न झालेल्या** गोष्टीपैकी भाषा ही आहे.

२. इंग्रजी भाषा खेडेगांवांत जरी गेली, **तरी मराठी बुडत नाही.**

## कृ.९. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.

१. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या ८ व्या वार्षिक समारंभाचे अध्यक्षपद लो. टिळक यांनी भूषविले होते.

२. भाषा ही कृत्रिम इलाजांनी सुधारते.

३. भाषेचा उत्कर्ष लोकांच्या व राष्ट्राच्या उत्कर्षावर अवलंबून असतो.

४. स्वदेश व स्वभाषा यांना व्यवहाराचा नियम लागू होतो.

**उत्तर:** १. सत्य    २. असत्य

३. सत्य    ४. असत्य

**कृ.१०. प्रश्न तयार करा.**

१. 'मुंबई मराठी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'स्वभाषा' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. दि. ७ सप्टेंबर १९०६ रोजी कोणत्या ग्रंथसंग्रहालयाचा आठवा वार्षिक समारंभ साजरा झाला?

२. आपल्याला कशाबद्दल कळकळ असावी असे लो. टिळकांना वाटते?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. खालील शब्दांना परिच्छेदातील पर्यायी शब्द लिहा.**

| दरिद्री | उत्कर्ष | निर्माण | पूर्वज | उपचार | विभाग | प्रगती |
|---|---|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

**उत्तर:** १. गरीब
२. अभिवृद्धी
३. उत्पन्न
४. वाडवडील
५. इलाज
६. इलाखा
७. उन्नती

**कृ.२. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. मराठी, भाषा, निजामशाही, भाषिक

२. वाढ, उन्नति, बुडणे, अभिवृद्धी

**उत्तर:** १. निजामशाही २. बुडणे

**कृ.३. पुढील वाक्यांत दिलेल्या पर्यायांपैकी योग्य तो वाक्प्रचार योजा.**

**(कळकळ असणे, नाईलाज असणे, हातावर हात ठेवून बसणे, उन्नती होणे.)**

१. देशातील तरुण पिढी सुशिक्षित होत नाही, तोवर त्या राष्ट्राची प्रगती होणे शक्य नसते.

२. मनुष्य उदरनिर्वाहासाठी कोठेही गेला, तरी त्याला मातृभूमीविषयी नेहमीच जिव्हाळा असतो.

**उत्तर:** १. देशातील तरुण पिढी सुशिक्षित होत नाही, तोवर त्या राष्ट्राची **उन्नती होणे** शक्य नसते.

२. मनुष्य उदरनिर्वाहासाठी कोठेही गेला, तरी त्याला मातृभूमीविषयी नेहमीच **कळकळ असते.**

**कृ.४. खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून तयार न होणारा शब्द शोधा.**

**निजामशाही**

निजाम | शाही | शाई | निजा | निशा | मजा | मही

**उत्तर:** शाई

**कृ.५. पुढील अपूर्ण वाक्य विविध प्रकारे योग्य शब्दयोजनेने पूर्ण करा.**

मराठी माझी मायबोली आहे, ________ .

**उत्तर:** १. मराठी माझी मायबोली आहे, **मला मराठी भाषेच्या संपन्नतेचा अभिमान आहे.**

२. मराठी माझी मायबोली आहे, **म्हणूनच तिचे संवर्धन ही माझी जबाबदारी आहे.**

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्दांचे नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांमध्ये वर्गीकरण करा.**

(मराठी, जग, ती, गरीब, वाढवा, सुसंस्कृत, बोलतात, हे, भाषा, आपली)

**उत्तर:**

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| मराठी, भाषा, जग | ती, हे, आपली | गरीब, सुसंस्कृत | वाढवा, बोलतात |

**कृ.२. खालील शब्द व विभक्ती यांच्या जोड्या जुळवा.**

| | शब्द | | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | नाट्यगृहात | अ. | तृतीया |
| २. | बरोबरीस | ब. | सप्तमी |
| ३. | व्यवहाराचा | क. | चतुर्थी |
| ४. | इलाजांनी | ड. | षष्ठी |

**उत्तर:** (१ - ब), (२ - क), (३ - ड), (४ - अ)

**कृ.३. वाक्यातील अव्यय ओळखून त्याचा प्रकार लिहा.**

जन्माबरोबर उत्पन्न झालेल्या गोष्टीपैकी भाषा ही आहे.

**उत्तर:** जन्माबरोबर - शब्दयोगी अव्यय

गोष्टीपैकी - शब्दयोगी अव्यय

**कृ.४. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

सुसंस्कृत

**उत्तर:**

| शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| सुसंस्कृत | सु (चांगला) असा संस्कृत | कर्मधारय समास |

**कृ.५. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. स्वभाषेबद्दल प्रत्येकाला कळकळ असते.

**(प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** स्वभाषेबद्दल कोणाला कळकळ नसते?

२. इंग्रजी भाषा खेडेगांवांत गेली, तरी मराठी बुडत नाही.

**(होकारार्थी करा.)**

**उत्तर:** इंग्रजी भाषा खेडेगांवांत गेली, तरी मराठी टिकून राहते.

**कृ.६. खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.**

१. जन्माबरोबर उत्पन झालेल्या गोष्टीपैकी भाषा हि आहे.

**उत्तर:** जन्माबरोबर **उत्पन्न** झालेल्या **गोष्टींपैकी** भाषा **ही** आहे.

२. भाषा ही कृत्रीम इलाजांनी सूधारत नाही.

**उत्तर:** भाषा ही **कृत्रिम** इलाजांनी **सुधारत** नाही.

**कृ.७. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. (अभिव्रद्धि) (अभिवृद्धी) (अभीवृद्धी) (अभीव्रुद्धि)

२. [सुसंस्कुत] [संुसस्कृत] [सुसंस्कृत] [सुसंस्क्रुत]

**उत्तर:** १. अभिवृद्धी   २. सुसंस्कृत

**ड. माझे मत**

**कृ.१. तुम्ही तुमची मराठी भाषा सुधारण्यासाठी काय प्रयत्न करता?**

**उत्तर:** माझी मराठी भाषा सुधारण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करतो. शाळेचे मराठी विषयाचे पाठ्यपुस्तक मी मोठ्याने शब्दोच्चार करत वाचतो. त्यामुळे शब्दांचे उच्चार अचूक होतात. मग त्यातील शब्दार्थ नीट समजून घेतो. उत्तरे लिहिताना शुद्धलेखनाकडे मी कोटेकोरपणे लक्ष देतो. शाळेच्या अभ्यासापलीकडे मी दररोज वृत्तपत्रातील बातम्या मोठ्याने वाचतो. त्यामुळे घडामोडींसोबतच विविध क्षेत्रांशी निगडित शब्द समजतात. सुट्टीच्या दिवसांत मी माझ्या आवडीच्या मराठी लेखकांची पुस्तके वाचतो. त्याबद्दल माझ्या मित्रमैत्रिणींसोबत, आईवडिलांसोबत चर्चा करतो. पुस्तकवाचनामुळे मला खूप नवीन मित्र मिळाले आहेत. एखादा नव्याने समजलेला शब्द मी मुद्दाम बोलण्यात वारंवार वापरतो. त्यामुळे तो शब्द व त्याचा अर्थ डोक्यात पक्का होतो.


## परिच्छेद २

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ११-१२ वरील (ओळ १२ ते २२) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[पेशवाईंत मराठीस मान होता ....................... ....................... अशी चिन्हे दिसत आहेत.]**

### अ. आकलन


**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. राजदरबार २. लष्कर

३. व्यापार


**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. मराठीचा अभ्युदय होईल.

२. आपला अभ्युदय होईल.

**कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. मराठी भाषेस राज्यासनावरून दूर केले आहे.

२. दरबारात मराठीला बंदी आहे.

३. विद्यापीठांतून मराठीची हकालपट्टी झाली आहे.

४. व्यापार-उद्योगातही मराठीचा वापर होत नाही.

**कृ.४. चौकट पूर्ण करा.**



**कृ.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. ________ मानानेंच मराठीची उन्नती होणार.

अ. हल्लीच्या परिस्थितीच्या

ब. देशाच्या परिस्थितीच्या

क. भाषिकांच्या परिस्थितीच्या

ड. इंग्रजीच्या परिस्थितीच्या

२. निबंधमालेतील पहिला निबंध ________.

अ. 'मराठी भाषेची समीक्षा' हा होता.

ब. 'मराठी भाषेची उत्पत्ती' हा होता.

क. 'मराठी भाषेची स्थिती' हा होता.

ड. 'मराठी भाषेचे अस्तित्व' हा होता.

उत्तर: १. **हल्लीच्या परिस्थितीच्या** मानानेंच मराठीची उन्नती होणार.

२. निबंधमालेतील पहिला निबंध **'मराठी भाषेची स्थिती' हा होता.**

**कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. इंग्रजी राजवटीत राजदरबाराची, लष्कराची व व्यापाराची भाषा मराठी होती.

२. आज आपल्याला आपले विचार स्वत:च्या भाषेत मांडण्याची सवय आहे.

३. निबंधमालेतील पहिला निबंध 'मराठी भाषेची स्थिती' यावर होता.

४. लेखकाच्या मते, आपला अभ्युदय झाला तर इंग्रजीचा अभ्युदय होईल.

उत्तर: १. असत्य २. असत्य

३. सत्य ४. असत्य

**कृ.७. प्रश्न तयार करा.**

१. 'परकी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'विद्यापीठ' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. आज आपल्याला आपले विचार कोणत्या भाषेत प्रगट करण्याची सवय झाली आहे?

२. मराठी भाषेला कोठून अर्धचंद्र मिळाला आहे?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१. अपमान × ☐

२. हल्ली × ☐

३. अधोगती × ☐

४. परकीय × ☐

५. संपन्न × ☐

६. अंत × ☐

७. लज्जास्पद × ☐

**उत्तर:** १. मान २. पूर्वी

३. उन्नती ४. स्वकीय

५. विपन्न ६. प्रारंभ

७. भूषणावह

**कृ.२. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

स्थितीतील बदल : ☐

उत्तर: स्थित्यंतर

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

राज्यसत्ता, राजदरबार, अभ्युदय, राज्यासन

**उत्तर:** अभ्युदय

**कृ.४. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगणारा योग्य पर्याय निवडा.**

१. अर्धचंद्र मिळणे :

अ. अष्टमी असणे. ब. चंद्रोदय होणे.

क. चंद्राचा लोप होणे. ड. हकालपट्टी होणे.

**उत्तर:** हकालपट्टी होणे.

२. चिन्ह दिसणे :

अ. आकाशात नक्षत्रे दिसणे.

ब. गणिते सोडविणे.

क. लक्षणे दिसणे.

ड. सांकेतिक भाषेत बोलणे.

**उत्तर:** लक्षणे दिसणे.

**कृ.५. खालील शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

राजदरबार

१ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९

**उत्तर:** राबा, जरा, जर, दरबार, दर, दबा, बारा, बाज, बाद

**कृ.६. खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून तयार न होणारा शब्द शोधा.**

अवतरण

तरण | आत | वर | वरण | तर | तण | रव | रण

**उत्तर:** आत

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्दांचे नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांमध्ये योग्य वर्गीकरण करा.**

(ते, आपण, धर्म, विपन्न, विचार, इंग्रजी, मिळाला)

**उत्तर:**

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| धर्म, विचार, इंग्रजी | ते, आपण | विपन्न | मिळाला |

**कृ.२. खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.**

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | प्रत्यय |
|---|---|---|---|
| १. | मराठीस | | |
| २. | रीतीने | | |
| ३. | लष्कराची | | |

**उत्तर:**

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | प्रत्यय |
|---|---|---|---|
| १. | मराठीस | स | द्वितीया/चतुर्थी |
| २. | रीतीने | ने | तृतीया |
| ३. | लष्कराची | ची | षष्ठी |

**कृ.३. वाक्यांतील अव्यय ओळखून त्याचा प्रकार लिहा.**

१. मराठी भाषेस आज राज्यासनावरून दूर केले आहे.

**उत्तर:** आज – क्रियाविशेषण अव्यय

राज्यासनावरून – शब्दयोगी अव्यय

दूर – क्रियाविशेषण अव्यय

२. तेव्हां राजदरबाराची, लष्कराची व व्यापाराची भाषा मराठी होती.

**उत्तर:** तेव्हां – क्रियाविशेषण अव्यय

व – उभयान्वयी अव्यय

**कृ.४. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

१. स्थित्यंतर २. अर्धचंद्र

**उत्तर:**

| | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| १. | स्थित्यंतर | अंतर (अन्य दुसरी) अशी स्थिती | कर्मधारय समास |
| २. | अर्धचंद्र | अर्धा असा चंद्र | कर्मधारय समास |

**कृ.५. कंसातील सूचनेनुसार खालील वाक्यांचा काळ बदला.**

१. इंग्रजीची स्थिती मराठीस यावयास वेळ लागेल.

**(अपूर्ण वर्तमानकाळ करा.)**

**उत्तर:** इंग्रजीची स्थिती मराठीस यावयास वेळ लागतो आहे.

२. मुंबई इलाख्यांतील निम्मे लोक मराठी बोलतात.

**(साधा भविष्यकाळ करा.)**

**उत्तर:** मुंबई इलाख्यांतील निम्मे लोक मराठी बोलतील.

**कृ.६. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. निबंधमालेंतील पहिला निबंध 'मराठी भाषेची स्थिती' हा होता. **(प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** निबंधमालेंतील पहिला निबंध 'मराठी भाषेची स्थिती' हा नव्हता का?

२. आपण राजकीय स्थितीचाही विचार केला पाहिजे.

**(आज्ञार्थी करा.)**

**उत्तर:** राजकीय स्थितीचाही विचार करा.

**कृ.७. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.**

तेव्हां राजदरबाराची लष्कराची व व्यापाराची भाषा मराठी होती

**उत्तर:** तेव्हां राजदरबाराची, लष्कराची व व्यापाराची भाषा मराठी होती.

**कृ.८. खालील शब्द लेखननियमांनुसार लिहा.**

| | |
|---|---|
| १. स्थीतंतर | २. श्रेयस्कर |
| ३. अभ्यूयद्य | ४. अध्रर्चंद |

**उत्तर:**

| | |
|---|---|
| १. स्थित्यंतर | २. श्रेयस्कर |
| ३. अभ्युदय | ४. अर्धचंद्र |

**ड. माझे मत**

**क्र.१. सध्या मराठी भाषेची स्थिती कशी आहे, असे तुम्हाला वाटते?**

उत्तर: इंग्रजीच्या प्रसारामुळे तत्कालीन मराठी संकुचित होत आहे असे लो. टिळकांचे मत होते. त्यामुळे मराठी बोलणाऱ्यांनी दैनंदिन जीवनात मराठीचा वापर करून मराठी टिकवावी असा संदेश त्यांनी दिला. हा सल्ला सध्याच्या काळालाही लागू होतो. आता तर बहुतांशी मुलांचे शालेय शिक्षण इंग्रजी माध्यमातून होते. पदवी, पदव्युत्तर शिक्षण इंग्रजीतून होते; त्यामुळे मराठीशी नाळ तुटत चालली आहे. घरातही मराठीतून संवाद साधणं कमी होत आहे. त्यामुळे तरुण पिढीला शुद्ध मराठी बोलता, वाचता, लिहिता येत नाही. मराठी माध्यमातून स्वेच्छेने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण, तसेच मराठी विषय शिकवणाऱ्या शिक्षकांचेही प्रमाण घटत आहे. परिणामत: मराठी शाळा बंद पडत आहेत. महाराष्ट्रासाठी व मराठीसाठी ही धोक्याची घंटा आहे. मराठीच्या पुनरुज्जीवनासाठी नियोजित प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

## परिच्छेद ३


पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. १२ वरील (ओळ २२ ते ३०) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

[इंग्रजीची व मराठीची भेट ......................

...................... अधिक झाला पाहिजे.]

अ. आकलन

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.




**उत्तर:** १. इंग्रजी वाङ्मय चांगले.

२. त्यानेंच मला सुख होत आहे.

३. मला दुसऱ्यांची जरूर नाही.

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. राष्ट्रातील सर्व व्यवहार त्याच भाषेत झाले पाहिजेत.

२. इतर भाषेतले ज्ञान त्या भाषेत उतरले पाहिजे.

३. हे काम करण्याबद्दल विद्वानांत उत्कट इच्छा असायला पाहिजे.

**कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. संस्कृतातील ज्ञान मराठीत आणले.


२. त्याबरोबरच मराठी भाषेचीही वृद्धी घडविली.

**कृ.४. चौकट पूर्ण करा.**

१.




२.




**उत्तर:** १. ज्ञानाच्या

२. मराठीची वाढ करणे

## कृ.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. हल्लीच्या परिस्थितीप्रमाणे मराठीस जरी संकुचित व्हावें लागले आहे, तरी ______ .

अ. ज्ञानाच्या दृष्टीने तिची वाढ होईल याची खात्री नाही.

ब. ज्ञानाच्या दृष्टीने तिची वाढ होईल हे खचित.

क. ज्ञानाच्या दृष्टीने तिचा क्षय होईल हे खचित.

ड. ज्ञानाच्या दृष्टीने तिची वृद्धी होईल याची खात्री आहे.

२. ______ कळविण्याचे साधन भाषा होय.

अ. एकमेकांचे विचार एकमेकांस

ब. एकमेकांचे निरोप एकमेकांस

क. कृतीमागील हेतू

ड. एकमेकांचे पूर्वग्रह एकमेकांस

उत्तर: १. हल्लीच्या परिस्थितीप्रमाणे मराठीस जरी संकुचित व्हावें लागले आहे, तरी **ज्ञानाच्या दृष्टीने तिची वाढ होईल हे खचित.**

२. **एकमेकांचे विचार एकमेकांस** कळविण्याचे साधन भाषा होय.

## कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.

१. लेखकाच्या मते, इतर भाषेतील ज्ञान मराठी भाषेत यायला हवे.

२. महाराष्ट्रातील साधु-संतांनी मराठी भाषा वाढविली.

३. लेखक युनिव्हर्सिटीत 'मराठी' विषय शिकवला गेला पाहिजे, अशा मताचे आहेत.

४. राष्ट्रांतील सर्व कामकाज ज्या भाषेतून चालते, तीच भाषा लोप पावते.

उत्तर: १. सत्य २. सत्य

३. सत्य ४. असत्य

**कृ.७. प्रश्न तयार करा.**

१. 'साधू-संत' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'संस्कृत' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. मराठी भाषा वाढवण्याचे काम कोणी केले?

२. साधू-संतांनी कोणत्या भाषेतील ज्ञान मराठीत आणले?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. खालील शब्दांना परिच्छेदातील पर्यायी शब्द शोधा.**

| | | |
|---|---|---|
| सुलक्षण | निश्चित | कामकाज |
| ↓ | ↓ | ↓ |
| १ | २ | ३ |
| विद्याविभूषित | तीव्र | माध्यम |
| ↓ | ↓ | ↓ |
| ४ | ५ | ६ |

**उत्तर:** १. सुचिन्ह २. खचित

३. व्यवहार ४. विद्वान

५. उत्कट ६. साधन

**कृ.२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१. इच्छा × ☐

२. संकुचित × ☐

**उत्तर:** १. अनिच्छा २. विशाल

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

इंग्रजी, साधू, मराठी, संस्कृत

**उत्तर:** साधू

**कृ.४. खाली दिलेल्या शब्दांपासून तीन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | कर्तव्य : | | | |
| २. | ज्ञान : | | | |
| ३. | दृष्टी : | | | |

**उत्तर:** १. कर्तव्यदक्ष, कर्तव्यनिष्ठ, कर्तव्यबुद्धी

२. ज्ञानार्जन, ज्ञानग्रहण, ज्ञानसाधना

३. दृष्टिकोन, दृष्टिदोष, दृष्टिहीन

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील वाक्यातील विशेषण ओळखा.**

काम करण्याबद्दल विद्वानांत उत्कट इच्छा पाहिजे.

**उत्तर:** उत्कट

**कृ.२. खालील शब्दांचे परिच्छेदातील सामान्यरूप शोधून लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्र | २. | विद्वान |
| ३. | साधन | ४. | महाराष्ट्र |
| ५. | संस्कृत | ६. | वाङ्मय |

**उत्तर:**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्रां | २. | विद्वानां |
| ३. | साधन | ४. | महाराष्ट्रां |
| ५. | संस्कृतां | ६. | वाङ्मय |

**कृ.३. वाक्यातील अव्यय ओळखून त्याचा प्रकार लिहा.**

१. हे काम करण्याबद्दल विद्वानांत उत्कट इच्छा पाहिजे.

**उत्तर:** करण्याबद्दल – शब्दयोगी अव्यय

२. 'तुम्ही – आम्ही भाषा बोलणारे एकत्र येऊन त्यांचा व्यवहार अधिक झाला पाहिजे.'

**उत्तर:** एकत्र – क्रियाविशेषण अव्यय

अधिक – क्रियाविशेषण अव्यय

कृ.४. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.

१. महाराष्ट्र २. सुचिन्ह

उत्तर:

| | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र | महान असे राष्ट्र | कर्मधारय समास |
| २. | सुचिन्ह | सु (चांगले) असे चिन्ह | कर्मधारय समास |

कृ.५. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.

१. 'मराठीची वाढ करणे आपल्या हाती आहे.'

(नकारार्थी करा.)

उत्तर: मराठीची वाढ करणे आपल्या व्यतिरिक्त इतर कुणाच्याही हाती नाही.

२. सर्व व्यवहार मराठी भाषेत झाले पाहिजेत.

**(आज्ञार्थी करा.)**

**उत्तर:** सर्व व्यवहार मराठी भाषेत करा.

**कृ.६. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.**

१. हे काम करण्याबद्दल विद्वानांत उत्कट इच्छा पाहिजे.

**उत्तर:** **ही कामे** करण्याबद्दल विद्वानांत उत्कट इच्छा पाहिजे.

२. 'युनिव्हर्सिटींत मराठी नको' असें म्हणणारा मी नाही.

**उत्तर:** 'युनिव्हर्सिटींत मराठी नको' असें **म्हणणारे आम्ही** नाही.

**कृ.७. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. संकुंचित | सकुंचित | संकूचित | संकुचित

२. परीस्थिती | परिस्थीती | परीस्थीति | परिस्थिती

**उत्तर:** १. संकुचित २. परिस्थिती

**ड. माझे मत**

**कृ.१. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कोणकोणते उपक्रम राबवता येतील? तुमच्या कल्पना मांडा.**

**उत्तर:** मराठी भाषेच्या संवर्धनासाठी विविध सणांच्या निमित्ताने शाळा, महाविद्यालये, निवासी संकुले यांत वक्तृत्व, कथाकथन, निबंधलेखन, वादविवाद स्पर्धा आयोजित करता येतील. ग्रंथालयांतर्फे विविध साहित्यिक कार्यक्रम आयोजित करता येतील, ज्याद्वारे अधिकाधिक वाचकांपर्यंत मराठी पुस्तकं व लेखक पोहोचतील. शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी वाचनाची गोडी लागावी यासाठी प्रत्येक शाळेत उत्तम दर्जाची वाचनालये विकसित करता येतील. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मुलांनी दर्जेदार मराठी पुस्तके वाचली, तर आपोआपच मराठी भाषा टिकून राहील व नवीन साहित्यही निर्माण होईल. टीव्ही, रेडिओ, इंटरनेट, वृत्तपत्र अशा सर्व प्रसारमाध्यमांमध्ये मराठीतून कार्यक्रम, बातम्या, लेख, माहिती प्रसारित करता येईल. दैनंदिन जीवनात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करावा, यामुळे मराठी भाषेच्या संवर्धनास हातभार लागेल.

## परिच्छेद ४


**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. १२ वरील (ओळ ३० ते ४०) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[भाषावाढीची इच्छा पाहिजे ......................**

**...................... वगैरे सर्व उत्तम निपजतात.]**

## अ. आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. नुसत्या भाषांतराने

२. नुसत्या नाटकांच्या रूपांतराने

३. इतिहासकार

४. कादंबरीकार


**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. प्रयासाचे २. दगदगीचे

३. खटपटीचे

कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.





उत्तर: १. सुशिक्षितांची कळकळ

२. ती बोलणाऱ्यांमध्ये जीव असायला पाहिजे.

कृ.४. चौकट पूर्ण करा.

१.
२.
३.




उत्तर: १. देशातील लोकांची भाषेबद्दलची कळकळ वाढते की नाही.

२. मराठीच्या गद्य ग्रंथांची वाढ.

३. मराठीत इंग्रजी शब्द जसेच्या तसे आल्यास.

**कृ.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. मराठी भाषेच्या अभिवृद्धीस ______.

अ. सुशिक्षितांची कळकळ हे मुख्य साध्य आहे.

ब. सुशिक्षितांची आपुलकी हे मुख्य साधन आहे.

क. सुशिक्षितांची कळकळ हे मुख्य साधन आहे.

ड. सुशिक्षितांची एकजूट हे मुख्य साधन आहे.

२. आईचे पोर दाईच्या दुधावर वाढले; तर ______.

अ. त्यास दाईची काळजी वाटत नाही.

ब. त्यास दाई आईहून प्रिय वाटते.

क. त्यास आईच्या दुधाची किंमत राहत नाही.

ड. त्यास आईची पर्वा राहत नाही.

उत्तर: १. मराठी भाषेच्या अभिवृद्धीस **सुशिक्षितांची कळकळ हे मुख्य साधन आहे.**

२. आईचे पोर दाईच्या दुधावर वाढले; तर **त्यास आईची पर्वा राहत नाही.**

**कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. इंग्रजांच्या राजवटीत, मराठीत पद्य ग्रंथांची भरभराट झाली.

२. सुशिक्षितांची कळकळ हे मराठी भाषेच्या अभिवृद्धीचे महत्त्वाचे साधन आहे.

३. भाषांतर करून, कवितेची यमके जुळवून भाषेचा उत्कर्ष साधला जाईल.

४. प्रस्तुत उताऱ्यात लेखकाने मराठीला आईची तर इंग्रजीला दाईची उपमा दिली आहे.

**उत्तर:** १. असत्य २. सत्य

३. असत्य ४. सत्य

**कृ.७. प्रश्न तयार करा.**

१. 'इंग्रजी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'उत्तम' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. मराठीच्या गद्य-ग्रंथांची वाढ कोणत्या अमदानीत झाली?

२. राष्ट्रांत लोकांच्या मनाची वाढ झाल्यास इतिहासकार कसे निपजतात?

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. खालील शब्दांना परिच्छेदातील पर्यायी शब्द शोधा.**

| | | | |
|---|---|---|---|
| मन | वरवर | प्रयत्न | वेगळे |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १ | २ | ३ | ४ |
| ग्रंथ | मेहनत | प्राण | घडणे |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| ५ | ६ | ७ | ८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **उत्तर:** | १. | अंत:करण | २. | वरकांती |
| | ३. | यत्न | ४. | निराळे |
| | ५. | पुस्तक | ६. | प्रयास |
| | ७. | जीव | ८. | निपजणे |

**कृ.२. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

बाळाचा सांभाळ करणारी स्त्री : [ ]

**उत्तर:** दाई

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

दगदग, खटपट, परिस्थिती, कळकळ

**उत्तर:** परिस्थिती

**कृ.४. वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा.**

१. **आळा घालणे** : आवर घालणे


**वाक्य:** सर्जेरावांनी पुढाकार घेऊन भाजीविक्रीतील दलालीला **आळा घातला.**

२. **उत्तम निपजणे** : उत्कृष्ट घडणे, निर्माण होणे.

**वाक्य:** कठोर शिक्षकांच्या तालमीत विद्यार्थी **उत्तम निपजतात.**


कृ.५. खालील शब्दांतील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.

१.




**उत्तर:** इति, इतिहास, हास, हार, हाका, सहा, सर, कास, रस

२.




**उत्तर:** निपज, तात, निज, पत, जप, ताप, तप

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील वाक्यातील नाम ओळखा.**

आजचे सुशिक्षित परकी भाषा बोलत आहेत.

**उत्तर:** सुशिक्षित, भाषा

**कृ.२. खालील शब्दांचे सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय आणि विभक्ती ओळखून कोष्टक पूर्ण करा.**

| | शब्द | सामान्यरूप | प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | रूपांतराने | | | |
| २. | अमदानीत | | | |
| ३. | दाईच्या | | | |
| ४. | परिस्थितीस | | | |

**उत्तर:**

| | शब्द | सामान्यरूप | प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | रूपांतराने | रूपांतरा | ने | तृतीया |
| २. | अमदानीत | अमदानी | त | सप्तमी |
| ३. | दाईच्या | दाई | च्या | षष्ठी |
| ४. | परिस्थितीस | परिस्थिती | स | द्वितीया/चतुर्थी |

**कृ.३. परिच्छेदातून शब्दयोगी अव्ययाची उदाहरणे शोधून लिहा व शब्दयोगी अव्यय अधोरेखित करा.**

**उत्तर:** भाषेबद्दल, अंत:करणपूर्वक, अभिवृद्धीसाठी, दुधावर, बोलणारांमध्ये.

**कृ.४. कर्मधारय समासाचे एक उदाहरण परिच्छेदातून शोधून लिहा व त्याचा विग्रह करा.**

**उत्तर:**

| समास | शब्द | विग्रह |
|---|---|---|
| कर्मधारय समास | सुशिक्षित | सु (चांगला) असा शिक्षित |

**कृ.५. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. 'मन तल्लीन नाही तर भाषेची अभिवृद्धी नाही.'

**(होकारार्थी करा.)**

**उत्तर:** मन तल्लीन असेल, तरच भाषेची अधिवृद्धी होते.

२. आईचें पोर दाईच्या दुधावर वाढलें, तर त्यास आईची पर्वा राहत नाही. **(प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** आईचें पोर दाईच्या दुधावर वाढले, तर त्यास आईची पर्वा राहील काय?

**कृ.६. खालील शब्दांचे लिंग बदला.**

१. विद्वान २. साधू

**उत्तर:** १. विदुषी २. साध्वी

**कृ.७. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. सुशिक्षितांची | सूशिक्षितांची | सुशीक्षितांची | सुशीक्षीतांची

२. अतं:करणपुर्वक | अंत:करणपूर्वक | अंत:करणपुर्वक | अतंक:रणपूर्वक

**उत्तर:** १. सुशिक्षितांची २. अंत:करणपूर्वक

**कृ.८. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.**

राष्ट्रांत लोकांच्या मनाची वाढ होते त्यावेळी इतिहासकार कादंबरीकार वगैर सर्व उत्तम निपजतात

**उत्तर:** राष्ट्रांत लोकांच्या मनाची वाढ होते, त्यावेळी इतिहासकार, कादंबरीकार वगैरे सर्व उत्तम निपजतात.

ड. माझे मत

**कृ.१. 'मराठी भाषेच्या वृद्धीसाठी मनापासून कळकळ असावी' या मुद्द्यावर तुमचे मत मांडा.**

उत्तर: भाषेची वृद्धी करणे ही एक दीर्घ तपोसाधना आहे. त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची आवश्यकता आहे. असे प्रयत्न करताना इप्सित ध्येय साधण्याची मनापासून कळकळ असायला हवी. तरच हातून उदात्त कार्य साधते. भाषावाढ म्हणजे निव्वळ भाषांतर, रूपांतर नव्हे. मराठी भाषेतूनच ज्ञानाची निर्मिती म्हणजेच विविध विषयांवरील ज्ञानपूर्ण पुस्तकांचे लेखन होणे गरजेचे आहे. आजही इंग्रजीत जेवढ्या विविध विषयांवरची पुस्तके उपलब्ध आहेत, तेवढ्या प्रमाणात मराठीत उपलब्ध नाहीत. त्यामुळे मराठी भाषेला अजूनही बराच मोठा पल्ला गाठायचा आहे. हे सर्व साध्य होण्यासाठी प्रचंड प्रयास करावे लागतील. मनात तीव्र इच्छा असेल, तरच हे शक्य आहे.

## परिच्छेद ५


**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. १२ वरील (ओळ ४१ ते ४९) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[देशी भाषेत शिक्षण दिले ......................**

**...................... बुद्धी परमेश्वर सुशिक्षितांस देवो."]**

अ. आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. मराठी ही आपली भाषा आहे.

२. मला मराठी भाषेत काम करायचे आहे.

३. मराठी भाषेशिवाय दुसरे साधन नाही.

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. मराठीत ग्रंथसंग्रह वाढविणे.

२. मराठी लोकांत वाचनाची आवड वाढीस लागणे.

३. आपल्या लोकांना मराठीत ज्ञान देण्याचा उपक्रम हाती घेणे.

कृ.३. ओघतक्ता पूर्ण करा.

स्वभाषा, स्वदेश, स्वधर्म यांचे ऋण फेडण्याचा प्रत्येकाने यत्न केला पाहिजे, याची कारणे

↓

१

↓

२

↓

विचार मरणे म्हणजे राष्ट्रीय मृत्यूच मानला पाहिजे

उत्तर: १. असा यत्न केला नाही, तर भाषा मृतभाषा होईल.

२. भाषा मेली म्हणजे विचार मेले.

कृ.४. चौकट पूर्ण करा.

१. ग्रंथप्रदर्शनातील प्रदर्शन वस्तू → [ ]

२. यावरून भाषेची योग्यता मोजली जाते → [ ]

उत्तर: १. ग्रंथ

२. भाषेतील ग्रंथ संख्येवरून

**क्र.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. स्वभाषा, स्वदेश, स्वधर्म ह्यासंबंधाने ______ .

अ. जन्मत:च आम्ही ऋण घेऊन आलों आहों.

ब. जन्मत:च आम्ही गुण घेऊन आलों आहों.

क. जन्मत:च आम्ही दोष घेऊन आलों आहों.

ड. जन्मत:च आम्ही ऋण फेडून आलों आहों.

२. ग्रंथसंग्रहालय हे ______ .

अ. वाचनसंस्कृतीचे प्रदर्शन होय.

ब. वाचकांच्या प्रतिमेचे प्रदर्शन होय.

क. वाङ्मयाचें प्रदर्शन होय.

ड. वाङ्मयाचे अविभाज्य अंग होय.

**उत्तर:** १. स्वभाषा, स्वदेश, स्वधर्म ह्यासंबंधाने **जन्मत:च आम्ही ऋण घेऊन आलों आहों.**

२. ग्रंथसंग्रहालय हे **वाङ्मयाचें प्रदर्शन होय.**

४. ग्रंथप्रदर्शनांत खूप ग्रंथ हवेत, असे लेखकाला वाटते.

**उत्तर:** १. असत्य  २. असत्य

३. सत्य  ४. सत्य

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

### कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.

१. बांधव : लोक : : उपकार : [ ]

२. जन्म : मृत्यू : : [ ] : विदेश

**उत्तर:** १. ऋण  २. स्वदेश

### कृ.२. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

१. सबब : [ ]

२. हेतू : [ ]

३. धंदा : [ ]

४. परमेश्वर : [ ]

**उत्तर:** १. निमित्त  २. उद्देश

३. उद्योग  ४. ईश्वर

**कृ.३. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

विशिष्ट वस्तू / कला लोकांच्या
दर्शनासाठी ठेवणे : [ ]

**उत्तर:** प्रदर्शन

**कृ.४. खालील वाक्यातील वाक्प्रचार ओळखून त्याचा अर्थ लिहा.**

आईवडिलांचे आपल्यावर इतके ऋण असते, की ते कधीच फेडता येत नाही.

**उत्तर: ऋण फेडणे :** उपकारांची परतफेड करणे.

**कृ.५. खाली दिलेल्या शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

१. ग्रंथ : [ ] [ ]

२. भावना : [ ] [ ]

**उत्तर:** १. ग्रंथसंग्रह, ग्रंथपाल

२. भावनाविवश, भावनाप्रधान

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्दांचे नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांमध्ये वर्गीकरण करा.**

**(विचार, देशी, ही, द्यावे, ग्रंथसंग्रह)**

**उत्तर:**

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| विचार, ग्रंथसंग्रह | ही | देशी | द्यावे |

कृ.२. खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | स्वदेशीने | | |
| २. | मराठीत | | |
| ३. | भाषावृद्धीस | | |
| ४. | प्रत्येकाची | | |

उत्तर:

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | स्वदेशीने | ने | तृतीया |
| २. | मराठीत | त | सप्तमी |
| ३. | भाषावृद्धीस | स | द्वितीया/चतुर्थी |
| ४. | प्रत्येकाची | ची | षष्ठी |

**कृ.३. दिलेल्या शब्दातील अव्ययाचा प्रकार ओळखून त्याच अव्यय प्रकाराचे उदाहरण उताऱ्यातून शोधून लिहा.**

सबबीवर

**उत्तर:** शब्दयोगी अव्यय

**उदा.** भाषेशिवाय

**कृ.४. खालील सामासिक शब्दाचा विग्रह करून समास ओळखा.**

मृतभाषा

**उत्तर:**

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| मृतभाषा | मृत अशी भाषा | कर्मधारय समास |

**कृ.५. खालील वाक्यांचा काळ ओळखा.**

१. मराठी ही आपली भाषा आहे.

**उत्तर:** साधा वर्तमानकाळ

२. मराठीची वाढ हां हां म्हणता होईल.

**उत्तर:** साधा भविष्यकाळ

**कृ.६. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. भाषा मेली म्हणजे विचार मेले. **(नकारार्थी करा.)**

**उत्तर:** भाषा जिवंत नाही म्हणजे विचारही जिवंत नाहीत.

२. महाराष्ट्रास मराठी नको असे नाही. **(होकारार्थी करा.)**

**उत्तर:** महाराष्ट्रास मराठी हवी आहे.

**कृ.७. खालील शब्द लेखननियमांनुसार लिहा.**

१. म्रुतभाशा २. म्रुत्यू

३. गृंथपृदर्शन ४. गृथंसग्रंहालय

उत्तर: १. मृतभाषा २. मृत्यू

३. ग्रंथप्रदर्शन ४. ग्रंथसंग्रहालय

**ड. माझे मत**

**कृ.१. इंग्रजीतून मराठीत रूपांतर केलेले एखादे पुस्तक तुम्हाला का आवडते ते लिहा.**

**उत्तर:** वि. वा. शिरवाडकर यांचे 'नटसम्राट' हे अजरामर नाटक मला फार आवडले. शेक्सपियरच्या 'किंग लियर' या गाजलेल्या नाटकावर आधारित ही कलाकृती केवळ अनुवाद नसून रूपांतर आहे. शिरवाडकरांनी किंग लियरचा केवळ गाभा उचलला आहे व मराठीत घेताना गर्भस्थानी असलेल्या शोकांतिकेवर आधारित 'नटसम्राट' नाटक लिहिले आहे. यातील पात्रे, संवाद, प्रसंग, जगण्यातले संदर्भ अस्सल मराठी मातीत मुरलेले वाटतात. त्यास मूळ इंग्रजीचा जराही स्पर्श जाणवत नाही. स्वगत हे शेक्सपिअरचे वैशिष्ट्य. 'नटसम्राट' या शोकांतिकेत शिरवाडकरांनी आपल्या खास शैलीत स्वगतं लिहिली. ज्यामुळेच ही कलाकृती मराठी साहित्यात अजरामर झाली व रंगभूमीवर अनेकांनी हे नाटक सादर केलं.

## सारांश लेखन

**'स्वभाषेची अभिवृद्धी' हा पाठ लक्षपूर्वक वाचून पाठाच्या आशयाचा सारांश लिहा.**

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिक समारंभात लोकमान्य टिळक यांनी केलेले हे भाषण असून, यात लो. टिळक मराठीच्या वृद्धीसाठी काय करावे ते सांगतात. ते म्हणतात, मराठी ही आपली मातृभाषा असल्याने आपण मराठीच्या वृद्धीसाठी प्रयत्न केलेच पाहिजेत. दोन कोटी मराठी भाषिकांची ही मराठी भाषा टिकून राहण्यासाठी आपण स्वत:ची प्रगती करावी; म्हणजे आपल्या भाषेचीही उन्नती होईल. इंग्रजीच्या वाढत्या प्रभावामुळे आता मराठी ही शासन दरबारातून, विद्यापीठातून व व्यापारातून नामशेष होत आहे. इतर भाषांतील ज्ञान मराठीत आणून मराठीचा विकास केला पाहिजे. त्यासाठी भाषांतर, अनुवादासोबतच नव्याने लिखाण केले पाहिजे. सुशिक्षितांनी मराठीस जवळ केले पाहिजे. मराठीत अधिक ग्रंथनिर्मिती केली पाहिजे. भाषेत जितके ग्रंथ अधिक, तितकी त्या भाषेची योग्यता अधिक असा निकष सांगून लो. टिळकांनी मराठीच्या वृद्धीचे अनेक मार्ग सुचवले आहेत.